## महिला क्रीडा महोत्सवाचे आयोजन

**तिरोडा :** महिला आर्थिक विकास महामंडळ गोंदियाव्दारे ग्रामीण जीवन्नोती अभियानातंर्गत प्रयास लोक संचालित साधन केंद्र परसवाडा प्रभाग अर्जुनी अंतर्गत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त महिला क्रीडा महोत्सवाचे आयोजन ७ जानेवारी रोजी करण्यात आले होते.

स्थानिक जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालयाच्या पटांगणात आयोजित महोत्सवात महिलांनी उत्स्फूर्तरित्या सहभाग घेत यशस्वी केले. कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच उषाताई यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रयास लोक संचालित साधन केंद्राच्या अध्यक्षा संगीताताई भगत होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक तागडे, सुषमाताई, रेषा राऊत, मंजु येरणे, विभाग ढलाले, टिकेश्वरी शहारे, माया चव्हाण, संतोषी भगत, आफरिन पठाण, ललिता वाघाडे, कोमल पटले, उपसरपंच मनिराम हिंगे, अरूणकुमार मिश्रा, महेंद्र भगत, चत्रुघन तितिरमारे, सुभाष वैद्य, किशोर काळे, सुनिता पारधी, अल्का पटले, सीएमसीआरचे कर्मचारी, अंगणवाडी सेविका योगेश्वरी पंधरे, चौरागडे, सरीता बोपचे आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. यानंतर मान्यवरांनी महिला सक्षमीकरणाला घेवून मार्गदर्शन केले. याप्रसंगी महिलांसाठी विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महिला उस्त्फूर्तरित्या सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयास लोक संचालित साधन केंद्राच्या पदाधिकारी, सदस्यांनी परिश्रम घेतले.

# सिरेगावबांध डिजीटल जि.प.प्राथ. शाळा अत्याधुनिक सुविधांनी सज्ज

**अर्जुनी मोरगाव :** डिजीटल शाळेची संकल्पना राज्यात लागू करण्यात आली असून आर्थिक आणि सामाजिक कारणांमुळे शाळेत जाऊ न शकणाऱ्या तसेच दुर्गम भागात राहणाऱ्या मुलांसाठी ही संकल्पना आहे. शाळांमध्ये उपस्थित राहून आणि डिजीटल माध्यमातून शिक्षणाला जोडून शिक्षणावर भर दिल जातो. त्याचच एक उदाहरण म्हणजे अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सिरेगावबांधची डिजीटल जि.प. प्राथमिक शाळा. या शाळेला जिल्ह्यातील इतर शाळांनी सहलीनिमित्ताने भेट द्यावी, यासाठी शाळेत अत्याधुनिक सोयीसुविधांने सिरेगावबांध जि.प. शाळा सुज्ज करण्यात आली आहे.

सानगडी-नवेगांवबांध मार्गावरील काही अंतरावर असलेले सिरेगावबांध, या गावातील प्रवेश केला की या स्मार्ट ग्रामची प्रचिती येते. हा संपुर्ण गाव सिसिटिवीच्या निगरानीत असून गावाला विवीध पुरस्काराने सन्मानित करण्यात आला आहे. या स्मार्ट गावात शहरातील शाळांना हेवा वाटावा आणी जिल्ह्यातील शाळांनी सहलीच्या माध्यमातुन एकदा या शाळेला भेट द्यावी अशा अत्याधुनिक सोयीसुविधाने सिरेगावबांधची डिजीटल जि.प.प्राथमिक शाळा सज्ज करण्यात आली आहे. तालुक्यातील सिरेगावबांध ग्रामपंचायतचे माजी सरपंच व विद्यमान उपसरपंच इंजी.हेमकृष्ण संग्रामे यांचे कार्यकर्तृत्वाने विदर्भ, महाराष्ट्रासह देशात नावलौकिक प्राप्त आहे. विज, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, रंगरंगोटी, सुंदर रस्ते, सुसज्ज नाल्या, ग्रामसफाई, अशा सुसज्ज व्यवस्थेने परिपूर्ण असलेल्या या गावात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सर्वबाबीने सुसज्ज आहे. जि.प.आदर्श डिजीटल वरिष्ठ प्राथमिक शाळा सिरेगावबांध येथे १ ते ८ पर्यंत वर्ग असुन पटसंख्या १०१ आहे. चार शिक्षक व चार स्वंयसेवक अध्यापनाचे काम करतात. शिक्षणाबरोबरच येथे संस्काराचे धडेही येथे दिल्या जाते.



### ग्रामपंचायत यशाच्या शिखरावर

या शाळेत प्रत्येक वर्ग डिजीटल असुन प्रत्येक वर्गात टिव्ही ची व्यवस्था आहे. प्रत्येक वर्गात पंखे व शुध्द पिण्याचे पाण्याची व्यवस्था आहे. पावसाचे पाणी वॉटर हारवेस्टींग व फिल्टर करुन विहिरीत सोडले जाते. प्रशस्त क्रीडांगण,शौचालय ,बाथरुमची स्वतंत्र व्यवस्था,ग्रंथालय,विज्ञानकक्ष, संगणक कक्ष,प्रशस्त ईमारत,रंगरंगोटी,सुसज्ज बागबगीचे,व संपुर्ण शाळा सिसिटिव्ही च्या निगराणीखाली आहे. निसर्गाचे वरदहस्त असल्याप्रमाणे दिसणारा शालेय परिसर, सुंदर शाळेची ईमारत भेट देणाऱ्यांचे मन मोहुन टाकते. मुख्याध्यापक टि.के.ठवकर यांचे कार्यकर्तृत्वात सध्या अध्यापनाचे काम सुरु आहे. सिरेगांवबांध च्या विद्यमान सरपंच सागरताई चिमणकर यांचे कार्यकाळात माजी सरपंच व विद्यमान उपसरपंच इंजी.हेमकृष्ण संग्रामे यांचे कुशल नेतृत्वातुन सिरेगावबांध ग्रामपंचायत यशाच्या प्रचंड शिखरावर झेप घेत आहे.

## प्रा.राकेश रोकडे यांना पीएचडी

**सालेकसा :** तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार प्रा.राकेश रोकडे यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी 'नागपूरमधील औद्योगिकीकरण आणि त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम' या विषयावर सखोल संशोधन केले आहे. पीएचडी पदवी प्रदान झाल्याने त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

डॉ.राकेश रोकडे यांनी त्यांच्या संशोधनात नागपूर जिल्ह्यातील वाढत्या औद्योगिकी करणाचा पर्यावरणीय संतुलनावर होणारा प्रभाव अभ्यासला आहे. या अभ्यासात त्यांनी औद्योगिक क्षेत्रांमधून होणारे प्रदूषण, नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास, तसेच यामुळे होणाऱ्या जैवविविधतेच्या घटांची सखोल मांडणी केली आहे. त्यांनी पर्यावरण संरक्षणाच्या उपाययोजना, शाश्वत विकासाच्या दृष्टीने धोरणात्मक उपाय, आणि औद्योगिक वाढ व पर्यावरणीय संतुलन यामध्ये समतोल साधण्याच्या गरजेवर भर दिला आहे. त्यांचा अभ्यासक्रमातील विषयांवर सखोल आकलन आणि प्रत्यक्षातील समस्या सोडविण्याचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांना प्रेरणा देतो. त्यांच्या संशोधनाची दखल घेत त्यांना पीचडी पदवी बहाल करण्यात आली. डॉ.राकेश रोकडे यांना पीएचडी पदवी प्रदान झाल्याबद्दल त्यांचे सालेकसा तालुक्यातील शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे.

## नवनियुक्त सरकारी अभियोक्तांचा सत्कार

**गोंदिया :** सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, गोंदिया अंतर्गत जिल्ह्यातील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयांमध्ये शासनाच्या वतीने कामकाज पाहण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस झालेल्या श्रीमती प्रणिता वसंतराव जोशी, श्रीमती रंजिता राजेंद्रकुमार शुक्ता, श्रीमती आशा तेजराम भाजीपाले व अभिलाष गोविंद येळे यांच्या सहाय्यक सरकारी अभियोक्ता (राजपत्रित गट-अ), पदावर नियुक्त्या करण्यात आल्या. दरम्यान ७ जानेवारी रोजी सहा. संचालक व सरकारी अभियोक्ता यांच्या कार्यालयामध्ये नवनियुक्तक सहाय्यक सरकारी अभियोक्तांचा स्वागत करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. टी. वानखेडे तर अतिथी पोलिस अधीक्षक गोरख भामरे उपस्थित होते. न्यायाधीश वानखेडे यांनी, अभियोक्ता हा फौजदारी न्याय वितरण प्रणाली चा भाग असून त्यांनी कायद्याची अंमलबजावणी होऊन न्यायव्यवस्थापित करण्याच्या प्रक्रियेत आपल्या कॅडर ला न्याय देण्याचा प्रयत्न करावा असा संदेश दिला. तर पोलीस अधिक्षक गोरख भामरे यांनी, न्यायदानाच्या प्रक्रियेमध्ये न्यायालय व पोलीस यांच्याबरोबरच अभियोक्ता हा देखील एक महत्वाचा घटक आहे त्यांनी जबाबदारीने कामकाज पहावे, अशा सूचना दिल्या. तर शासनाच्या वतीने कामकाज पाहण्याची सुवर्णसंधी अभियोक्त्यांना मिळत असून त्या संधीचे त्यांनी सोने करावे असे मत सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता सतिशकुमार घोडे यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभियोक्ता कमलेश दिवेवार यांनी केले. यावेळी ॲड. सतिशकुमार घोडे, डीवायएसपी महेर, पोनि. किशोर पर्वते तसेच सीएमएस सेलचे अधिकारी व अंमलदार, सर्व सहाय्यक सरकारी अभियोक्ते तसेच अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने बहरली सेंद्रिय परसबाग

**सडक अर्जुनी :** जि. प.वरिष्ठ प्राथमिक शाळा बाम्हणी/ख. येथे प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजने अंतर्गत शाळा व्यवस्थापन समितीच्या पुढाकाराने,विध्यार्थी, पालक व शिक्षकांच्या मदतीने शाळेत सुंदर सेंद्रिय परसबाग बहरली आहे.परसबाग लागवड करण्याच्या कौशल्याबाबत गावातील प्रगतशील युवा शेतकरी प्रविणभाऊ तवाडे, देवानंद हत्तीमारे, लोकेश तरोने, भास्कर कोरे, गंगाधर वाढई. शंकरभाऊ चुटे, कृषि सखी ललिताबाई चुटे यांनी सर्व मुलांना मार्गदर्शन व वेळोवेळी सहकार्य केले. उल्लेखनीय असे की, परसभागेत विविध फळ भाज्या, पालेभाज्या चे उत्पादन घेवून विद्यार्थ्यांच्या दैनंदिन शालेय पोषण आहारात त्याचा उपयोग केला जातो.



परसबाग हा प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या उपक्रमाचा एक भाग असला तरी आधुनिक शेती कौशल्याचे ज्ञान व्हावे व व्यवहार ज्ञान वाढावे या उद्देशाने उरलेल्या भाज्यांचे बाम्हणी /ख. येथील आठवडी बाजारात परसबागेतील ताज्या भाजीपाल्याची विक्री स्वतः विधार्थांनी केली व अर्थाजनाचे धडे गिरवले. आपलेच पाल्ये दुकानदार झाले म्हणून आठवडी बाजारात येणारे पालकग्राहक प्रथम विध्यार्थ्यांनी लावलेल्या भाजीच्या दुकानातून पालेभाज्या खरेदी करून कौतुक केले. परसबाग उपक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष लेकचंद शेंडे, उपाध्यक्ष सुषमाताई मेश्राम, विकास खोटेले, प्रदीप मेश्राम, जितेंद्र चुटे, धर्मेंद्र रहेले, हंशराज मेश्राम, अजय रहेले, कुरसुंगे, वाढईताई, भेंडारकर ताई, लेंडेताई, ठाकरेताई मरस्कोले, मुख्याध्यापिका सौ. नेवारे,पद.शिक्षक अरुण शिवणकर, गायधणे, पद.शिक्षक वलथरे, बी.ए.शिवणकर , पटणे यांचे योगदान महत्वाचे राहिले.

## विद्यार्थ्यांची 'रेझींग डे' अंतर्गत पोलीस स्टेशनला भेट

**सडक अर्जुनी :** स्थानिक एस.चंद्रा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी 'रेझींग डे' अंतर्गत ४ जानेवारी रोजी पोलीस स्टेशन डुग्गीपार येथे भेट दिली. यावेळी शाळेच्या सहाय्यक शिक्षिका माधुरी टेंभूर्णे, भावना शेंडे, विद्या लंजे सुद्धा उपस्थित होते. त्याचप्रमाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक रूपाली पवार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बिलास गावंडे आणि इतर पोलीस उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षिकांचे व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक रुपाली पवार यांनी 'रेझींग डे' म्हणजे काय ? आणि ते कशासाठी राबवले जातात याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थीनींनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर देऊन त्यांचे मार्गदर्शन केले. सहायक पोलीस उपनिरीक्षक विलास गावंडे यांनी विद्यार्थ्यांना पोलिसांच्या शस्त्राविषयी व त्यांचे उपयोग कशाप्रकारे केले जाते याविषयी मार्गदर्शन केले.

## राज्यस्तरीय खो - खो स्पर्धेत नागपूरच्या संघाने मारली बाजी

**गोंदिया :** जसपुण्य शिक्षक संस्था आणि जिल्हा खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ५७ व्या विदर्भ खो-खो राज्यस्तरीय ज्येष्ठ पुरुष व महिला स्पर्धेचे लिटल फ्लॉवर इंटरनॅशनल स्कूलने आयोजन केले होते.

या स्पर्धेत पुरुष गटात नागपूर जिल्हा संघाने, तर महिला गटातही नागपूर जिल्हा संघाने बाजी मारली. विजेत्या संघांना माजी नगरसेवक घनश्याम पानतावणे, विवेक मिश्रा, शाळा संचालक शिला बिसेन, भूवन बिसेन, हिमांशू बिसेन, स्वप्नील पारधी यांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले. याप्रसंगी एस. ए. वहाब यांनी, जो संघ जिंकला नाही त्यांनी निराश न होता आणखी मेहनत घेऊन भविष्यात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून जिल्ह्याचे नावलौकिक वाढवावे, असे सांगितले. याप्रसंगी अ. ब. मरसकोल्हे, तेजसिंग बिसेन, अंकुश गजभिये, अतुल बिसेन, पंकज बोरकर, उज्ज्वल बानासुरे, प्रतिक लाडेकर, मंगेश कावरे, शुभम पिसोडे, अक्षय बनकर, जितेंद्र पालांदूरकर यांच्यासह आयोजन समितीचे सर्व सदस्य, खेळाडू व जिल्ह्यातील खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यस्तरीय वुशू स्पर्धेकरीता विद्यार्थ्यांची निवड

**तिरोडा :** ऑल महाराष्ट्र वूशु एसोसिएशनच्या मान्यतेने व ऑल नांदेड़ जिल्हा वूशु एसोसिएशन द्वारे आयोजित २२ वी राज्यस्तरीय सिनियर महिला -पुरुष वूशु अजिंक्यपद स्पर्धा -२०२५ चे आयोजन स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स यशवंतराव चौहान महाविद्यालय गुरुगोविंद सिंह स्टेडियम नांदेड़ येथे ७ ते १० जानेवारी रोजी करण्यात आले आहे. या स्पर्धेत ऑल गोंदिया जिला वूशु एसोसिएशनच्या खेड़ाडंची निवड झाली आहे.

या स्पर्धेमध्ये पंच म्हणून ऑल गोंदिया जिला वूशु एसोसिएशनचे अध्यक्ष सुनील शेंडे, संजय नागपुरे, चंद्रप्रकाश प्रजापती याची निवड़ झाली. स्पर्धेत कु.पूनम पड़ोले ४८ किलो ग्रॅम, कु.प्रादन्या साखरे ४५ किलो ग्रॅम, सोहेल दोहे ६० किलो ग्रॅमु, निशांत भेंड़ारकर ४८ किलो ग्रॅम, हर्षल दोहे ५२ किलो ग्रॅम, कुणाल चंदनबटवे ६५ किलो ग्रॅम, ओमकुमार शेंडे ५६ किलो ग्रॅम, राहुल मड़ावी, यासिन सैयद, युवराज अम्बारगी यांची निवड़ झाली. व निवड झालेल्या स्पर्धकाना तालुका क्रीड़ा समितीचे अध्यक्ष राजेश असाटी, अशोक असाटी, सुरेश सहारे, प्रदीप मेश्राम, विकेश मेश्राम, आकाश शहारे, अमन नंदेश्वर, पंकज तिड़के, प्रथम सोनकावडे, दर्शन येरपुडे, मोहित यादव यांनी अभिनंदन केले.

## स्वाधार योजनेसाठी अर्ज करा; १५ जानेवारी पर्यंत मुदतवाढ

**गोंदिया :** अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही. अशा विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता आदि आवश्यक सुविधा विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेसाठी सन २०२४-२५ मधील अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली असून आता विद्यार्थ्यांना १५ जानेवारी २०२५ पर्यंतपोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करण्यात येणार आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी वसतीगृह प्रवेशासाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे दिलेल्या मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर केलेले आहेत आणि ज्या विद्यार्थ्यांना वसतीगृहामध्ये प्रवेश मिळालेला नाही अशा सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे आपोआप स्वाधार योजनेसाठी वर्ग होणार आहेत.

अशा विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेसाठी नव्याने अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही. जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणी इयत्ता ११ वी व १२ वी तसेच इयत्ता बारावी नंतरच्या व्यवसायिक तसेच बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या स्वाधार योजनेकरीता पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केले.

## पुरस्कार हे नव्या उमेदीने काम करण्याची प्रेरणा देतात : डॉ. डोंगरवार

**देवरी :** एखाद्या क्षेत्रात कार्य करण्यासाठी समर्पित जीवन जगावे लागते. श्याम महाजन बहुउद्देशिय विकास संस्था शेडेपारच्या माध्यमातून डॉ. घनश्याम निखाडे यांनी समाजोपयोगी कार्य मागील १३ वर्षापासून अविरतपणे करीत आहेत. डॉ. निखाडे यांचे कार्य अलौकिकरित्या मोठे ठरते. कुठल्याही क्षेत्रात काम करण्यांना पुरस्कार देणे गरजेचे आहे. कारण पुरस्कार जीवन जगण्याची व नव्या उमेदीने काम करण्याची प्रेरणा देतात, असे प्रतिपादन डॉ. चंद्रसुरेश डोंगरवर यांनी व्यक्त केले.



दलीराम डोमाजी निखाडे (महाजन) यांचा ८५ व्या जयंती निम्मित श्याम महाराज बहुउद्देशिय तर्फे भव्य विदर्भ स्तरीय पुरस्कार २०२५ वितरण सोहळा शेडेपार येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या पटांगणात ५ जानेवारी रोजी पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या १० मान्यवरांचा विदर्भस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. समाजप्रबोधनकार इंजि. पवन दवंडे, नगरसेवक यादोराव पंचमवार, समाजसेविका उमा किशोर गजभिये, डॉ. जितेंद्र ठाकुर, आदर्श शिक्षकरत्न जयपाल मारवाडे, सरबजीतसिंग भाटिया, सुरेश चन्ने, सरपंच हर्ष मोदी, राजरत्न गौरव, रमेश लांजेवार, राजेश राऊत, कु. तामेश्वरी नेताम, गुणवंत विद्यार्थिनी कु. प्राची मदणकर यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देविदासजी लोहकर, उदघाटक डॉ. चंद्रसुरेश डोंगरवर, अतिथी अशोक राऊत, सुरेश निखाडे, संजय मलेवार, रघुनाथ वाडीभस्मे, प्रा. सुनंदा भुरे, संतोष लांजेवार, तारामती आंभीलकर, शिवचरण निखाडे, मुरलीधर निखाडे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा विजया निखाडे , संचालन मिथुन चव्हाण व आभार डॉ घनश्याम निखाडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विजया निखाडे, डॉ घनश्याम निखाडे, तिलक गावळकर, संदीप गायधने, जितेंद्र चांदेवार, विश्वनाथजी लांजेवार, हितेश हटवार, विनोद गावळ , डॉ ठलाल, सचिन राऊत, हिवराज गायधने, विक्रम वंजारी, मनोज गावळ, मनोज सरजारे, हेमंत गावळ आदींनी सहकार्य केले.

## पत्रकारांनी जनतेचे प्रश्न निस्वार्थपणे मांडून समाजाला दिशा द्यावी : राजेश गुणेरिया

**तिरोडा :** पत्रकार का समाजाचा दर्पण असतो. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक मोठ्या अपेक्षेने पत्रकाराकडे पाहतात. पत्रकारीता करताना याचे भान ठेवून समाजातील ज्वलंत समस्या निस्वार्थपणे वाचा फोडून सर्वसामान्यांना लेखनीतून न्याय देण्याचे काम पत्रकारांनी करावे, असे प्रतिपादन नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेश गुणेरीया यांनी केले.



आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती व पत्रकार दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना गुणेरिया बोलत होते. कार्यक्रमाला अतिथी म्हणून जिल्हा बँकेचे सचिव डॉ.अविनाश जायस्वाल, माजी उपाध्यक्ष सलीम जवेरी, देवेन्द्र तिवारी, उद्योगपती तथा जेष्ठ पत्रकार मुकेश अग्रवाल, लक्ष्मीनारायण दुबे, नितीन आगासे, पंकज देहलीवाल, निलकंठ (निलु) साकुरे आदि मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात पत्रकार संघाचे ज्येष्ठ पत्रकार मुकेश अग्रवाल व पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय खोब्रागडे यांच्या हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन, पुष्पहार अर्पण करून दिपप्रजलनाने करण्यात आली. पत्रकार दिनानिमित्त अविनाश जायसवाल यांनी पत्रकार क्षेत्रातील योगदानाबद्दल पत्रकार संघातील सर्व सदस्याचे सत्कार व अभिनंदन करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ.अविनाश जयस्वाल यांनी सांगितले की निस्वार्थीपणे पत्रकारिता तिरोडा तालुका पत्रकार संघाच्या वतीने सर्व पत्रकार जनतेला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहेत त्या कृतज्ञता व्यक्त केले. पत्रकारानी नेहमी तत्पर राहून जनतेला न्याय द्यावे असे आवाहन केले. राजेश गुनेरिया यांनी उत्कृष्ट पत्रकार म्हणून सर्वांचे गुणगौरव केले तसेच सलीम जवेरी यांनी पत्रकारांचे चांगल्या कार्याचा गुणगौरव केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक देवेन्द्र तिवारी यांनी केले. संचालन सचिन ढबाले व आभार स्वप्निल शाहारे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिपक जायस्वाल, राजू चामट, सुरेंद्र भांडारकर, मनोहर मुरलीधर, गोंडाने, नंदनवार, प्रा.नरेश असाटी, अमरदीप बडगे, हितेश रहांगडाले, हितेश वालदे, संजू केसरवानी, डॉ.संजय जगने, पोमेश रहांगडाले, आदित्य आगाशे आदींनी सहकार्य केले.

## गोरठा येथे रासेयो शिबिर संपन्न

**आमगाव :** विद्या निकेतन कनिष्ठ महविद्यालय द्वारा राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे आयोजन आदर्श प्राथमिक शाळा गोरठा येथे करण्यात आले होते. १ ते ७ जानेवारी या कालावधीत आयोजित शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



शिबीराचे उद्‌घाटन संस्था सचिव रघूबीरसिंह सुर्यवंशी यांच्या हस्ते पोलिस निरिक्षक तिरूपति राणे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून सरपंच धर्मराज पाथोडे, जि.प.सदस्या छबुताई उके, नंदु कोरे, नेतराम पाथोडे, प्रदिप चुटे, राजेन्द्र चुटे, जगमोहन पाथोडे, योगिता मेन्ढे, ललिता शेन्डे, इन्दूबाई चौधरी, प्राचार्य सिंग, रविन्द्र खापर्डे आदि मान्यवर उपस्थित होते.

सात दिवसीय शिबीरात विविध जनजागृती आणि सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात आले. पीएसआय निलकंठ गिते, वरिष्ठ शिक्षक राजेन्द्र बंसोड यांच्या उपस्थितीत चर्चासत्र घेण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.संजय बुराडे यांनी केले. संचालन रासेयो संयोजक प्रा.गजानन तरोने आणि आभार प्रा.प्रविण मानापूरे यांनी केले.

: आरएनआय रजिस्ट्रेशन क्रमांक : No-MAHMAR 2011/40516
महासागर गोंदिया
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय : शुभमंगल कार्यालय, एलआयसी ऑफीसजवळ, गणेशनगर, गोंदिया येथून प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन-०७१२-२७६७२८, ९३७३११७०४२ स्थानिक संपादक : जयंत मदनलाल शुक्ला, फोन ९८२२३८६९९९ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील)

